**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण किंवा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी किंवा सचिव, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, गट-अ (तांत्रिक) (वरिष्ठ) (राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा या संवर्गातील अधिकारी यांची बदली.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**
**शासन आदेश क्रमांक: बदली-२०२६/प्र.क्र.६२/व्यशि-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मुख्य इमारत, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : १५ जुलै, २०२६.**

संदर्भ :- (१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२९०/ कार्या. १२, दिनांक १९/११/२०१६
(३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा, मुंबई यांचे पत्र क्र.०३/आस्था-१/गट अ (तां.)/नि.बदली/२०२६/१९६, दि.३०/०४/२०२६.

**आदेश-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या मधील तरतुदी व संदर्भ क्र. (२) येथील शासन निर्णयान्वये सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण किंवा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी किंवा सचिव, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, गट-अ (तांत्रिक) (वरिष्ठ) (राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा या संवर्गातील अधिकारी यांची प्रशासकीय बदली खालीलप्रमाणे करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अधिका-याचे नाव, पदनाम व सध्या कार्यरत असलेले ठिकाण | बदलीने केलेल्या पदस्थापनेचे पदनाम व ठिकाण |
|---|---|---|
| *1* | *2* | *3* |
| १ | श्री. सचिन विष्णू सुर्यवंशी, प्राचार्य, श्री. गुरगोविंद सिंधजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड | सहायक संचालक (तांत्रिक), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (रिक्त पदावर) |

२. उपरोक्त अधिकारी यांची बदली ही प्रशासकीय असल्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम,

१९८१ मधील तरतुदीनुसार पदग्रहण अवधी व बदली विषयक प्रवास भत्ता शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय राहील.

३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी बदली झालेल्या उक्त अधिकारी यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. बदली झालेले अधिकारी यांनी बदलीच्या पदावर तात्काळ हजर व्हावे, याबाबतचा रुजू अहवाल संचालनालयाने शासनास तात्काळ सादर करावा.

४. उक्त अधिकारी यांना शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेले अधिकारी यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते उक्त अधिकारी यांना मूळ पत्त्यावर नोंदनी पोच देय डाकेने परत करावेत.

५. बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी कार्यमुक्त झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी इ.) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी, अन्यथा त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा “अकार्यदिन” (dies non) म्हणून गणला जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर बदली आदेशानुसार उक्त अधिकारी हे तात्काळ बदलीच्या पदावर हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्र. २०२६०७१५१५४८०३४६०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINOD VISHWANATH CHAUDHARI

Digitally signed by VINOD VISHWANATH CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=D3A61CF46D54B669BA9F5D9BA4F32DD8ED54A7EA64E7D1483AE325DB5B8A3005, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8933E15B4DBF1243939DE4EFCC94AD1431E1DE56B3F2F32F01837980F363FA8D, cn=VINOD VISHWANATH CHAUDHARI
Date: 2026.07.15 15:49:10 +05'30'

**(विनोद वि. चौधरी)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा.मंत्री, कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता यांचे खाजगी सचिव,

२) अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई-३२.

३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर. (संचालकांमार्फत)

४) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर. (संचालकांमार्फत)

५) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय (सर्व संबंधितांना संचालकांमार्फत)

७) अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पुर्व), मुंबई-५१ / जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालकांमार्फत)

८) उप कोषागार अधिकारी, (सर्व संबंधितांना संचालकांमार्फत)

९) श्री. सचिन विष्णू सुर्यवंशी, प्राचार्य, श्री. गुरगोविंद सिंधजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड (संचालकांमार्फत)

१०) निवडनस्ती (व्यशि-१).